Test Booklet Code & No. **D**
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

# Paper-III
# SOCIOLOGY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

   (Name) ................................................

2. (Signature) ..........................................

   (Name) ................................................

Seat No. | | | | | | |
(In figures as in Admit Card)

Seat No. ............................................................
(In words)

OMR Sheet No. | | | | | | |
(To be filled by the Candidate)

## MAY - 14316

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 75 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Sociology
## Paper III
# समाजशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions, each carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Who implements the National Rural Employment Programme ?
   (A) District Rural Development Agencies
   (B) Block Development Officer
   (C) Ministry of Rural Development
   (D) Chief Executive Officer

2. When was the Bonded Labour (Abolition) Act passed in India ?
   (A) 1948
   (B) 1976
   (C) 1970
   (D) 1952

3. Who led the 'Bharatiya Kisan Union' to launch the peasant struggle in India ?
   (A) Narayan Swami Naidu
   (B) Mahendra Singh Tikkait
   (C) Sharad Joshi
   (D) M.D. Nanjuda Swamy

1. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमाची अंमल-बजावणी कोण करते ?
   (A) जिल्हा ग्राम विकास संघटना
   (B) गट विकास अधिकारी
   (C) ग्राम विकास मंत्रालय
   (D) मुख्य कार्यकारी अधिकारी

2. वेठबिगार निर्मुलन कायदा भारतात केव्हा संमत झाला ?
   (A) 1948
   (B) 1976
   (C) 1970
   (D) 1952

3. भारतात शेतकरी संघर्ष सुरू करण्यात 'भारतीय किसान युनियन' चे नेतृत्व कोणी केले ?
   (A) नारायणस्वामी नायडू
   (B) महेन्द्रसिंग टिक्कैत
   (C) शरद जोशी
   (D) एम.डी. नंजुडास्वामी

4. Who is the author of the book entitled 'Deviant Behaviour : A Social Learning Approach' ?

(A) Ahuja Ram

(B) Carey James

(C) Merton Robert

(D) Akers Ronald

5. Who of the following has given the psychological, physiological, social and miscellaneous causes of drug addiction ?

(A) Ram Ahuja

(B) C.B. Mamoria

(C) G.R. Madan

(D) S.N. Agarwal

6. Which disease is the most frequent killer of both men and women ?

(A) Cancer

(B) Diabetes

(C) AIDS

(D) Heartfail

4. 'डेव्हिएंट बिहेव्हियर : ए सोशल लर्निंग अॅप्रोच' या पुस्तकाचे लेखक कोण ?

(A) आहुजा राम

(B) केरी जेम्स

(C) मर्टन रॉबर्ट

(D) अॅकर्स रोनाल्ड

5. खालीलपैकी कोणी मादक द्रव्य सेवनाची मानसशास्त्रीय, शरीरशास्त्रीय, सामाजिक आणि इतर स्वरूपाची कारणे दिली आहेत ?

(A) राम आहुजा

(B) सी.बी. मॅमोरिया

(C) जी.आर. मदन

(D) एस.एन. अगरवाल

6. स्त्री आणि पुरुष दोघानाही चट्कन मारणारा रोग कोणता ?

(A) कॅन्सर (कर्क रोग)

(B) डायबेटिस (मधुमेह)

(C) एड्स

(D) हृदय रोग

7. Which is known as 'Umbrella Programme' in promoting National Health ?

(A) National Urban Health Mission

(B) National Rural Health Mission

(C) Family Welfare

(D) Janani Suraksha Yojana

8. Who has investigated how people cope with disease and chronic illness in their daily lives ?

(A) Labelling ideologists

(B) Conflict thinkers

(C) Functionalist

(D) Symbolic interactionist

7. राष्ट्रीय आरोग्य उन्नतीसाठी 'अंब्रेला कार्यक्रम' म्हणून कोणता कार्यक्रम परिचित आहे ?

(A) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

(B) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

(C) कुटुंब कल्याण

(D) जननी सुरक्षा योजना

8. लोक त्यांच्या दैनंदिन जीवनात रोगांचा आणि मुरलेल्या दुखण्यांचा सामना कसा करतात याविषयीचे संशोधन कोणी केले आहे ?

(A) लेबलिंग विचारक

(B) संघर्षवादी विचारवंत

(C) प्रकार्यवादी

(D) सांकेतिक आंतरक्रियावादी

9. Who was of the opinion that an excessive number of people would give rise to poverty and other social ills, since it was not possible to increase land and property as rapidly as the size of the population ?

   (A) Aristotle

   (B) Plato

   (C) Malthus

   (D) Kautilya

10. Which committee was appointed for proposing a National Population Policy in 1993 ?

   (A) Swaminathan Committee

   (B) National Planning Committee

   (C) Santhanam Committee

   (D) Mudaliar Committee

9. 'अतिरिक्त लोकसंख्या ही दारिद्र्य आणि इतर सामाजिक विघातक प्रवृत्ती निर्माण करते कारण लोकसंख्येच्या वेगाने वाढत जाणाऱ्या आकार-मानाच्या प्रमाणात जमिनीच्या आणि संपत्तीच्या स्वरूपात वाढ करणे शक्य नसते' असे मतप्रदर्शन कोणी केले आहे ?

   (A) ॲरिस्टॉटल

   (B) प्लेटो

   (C) माल्थस

   (D) कौटिल्य

10. 1993 साली राष्ट्रीय लोकसंख्या धोरण प्रस्तावित करण्यासाठी कोणती समिती नेमण्यात आली होती ?

   (A) स्वामिनाथन् समिती

   (B) राष्ट्रीय योजना समिती

   (C) संथानम् समिती

   (D) मुदलियार समिती

11. The average number of persons living per square kilometer is known as ................................ .

(A) Migratory population

(B) Density of population

(C) Dependency of population

(D) Declining population

12. Which of the following factors is related to the size of the population and the utilization of the countries resources ?

(A) Younger Population

(B) Overpopulation

(C) Increasing Population

(D) Stagnant Population

11. दर चौरस किलोमीटर मागे लोकांच्या राहाण्याची सरासरी संख्या कोणत्या नावाने ओळखली जाते ?

(A) स्थलांतरीत लोकसंख्या

(B) लोकसंख्येची घनता

(C) लोकसंख्येचे अवलंबित्व

(D) लोकसंख्येतील घट

12. खालीलपैकी कोणता घटक हा लोकसंख्येचा आकार आणि देशाच्या साधनसंपत्तीची उपयोगिता यांच्याशी संबंधित आहे ?

(A) तरुणांची लोकसंख्या

(B) अतिरिक्त लोकसंख्या

(C) वाढती लोकसंख्या

(D) स्थिर लोकसंख्या

13. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and other is as Reason (R) :

**Assertion (A) :** Every inmate of a prison has to carry on tightly scheduled activities in the company of strangers.

**Reason (R) :** A prison is a unisex world where every inmate is stigmatized.

Select the *correct* answer from the codes given below :

**Codes :**

(A) Both (A) and (R) are true and (R) is not the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(C) (A) is false but (R) is true

(D) (A) is true but (R) is false

13. खाली दोन विधाने दिली आहेत, एकास विधान (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

**विधान (A) :** तुरुंगातील प्रत्येक सहनिवासी व्यक्तीली अनोळखी व्यक्तीच्या सहवासात अगदी निर्बंधित स्वरूपात नेमून दिलेली कामे पार पाडावी लागतात.

**कारण (R) :** तुंरुग हे असे एकलिंगी विश्व आहे की जिथे प्रत्येक सहनिवासी हा कलंकित असतो.

खाली दिलेल्या संकेतांकामधून **अचूक** उत्तर निवडा :

**संकेतांक :**

(A) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(B) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(C) (A) हे चूक आहे, परंतु (R) हे बरोबर आहे

(D) (A) हे बरोबर आहे, परंतु (R) हे चूक आहे

14. The main focus of introducing the population education is on ......... .

(A) Women

(B) Younger generation

(C) Working population

(D) Population of 60+

14. लोकसंख्या शिक्षण प्रामुख्याने कोणावर केंद्रित करण्यात आले ?

(A) स्त्रिया

(B) तरुण पिढी

(C) क्रियाशील लोकसंख्या

(D) 60 वर्षावरील लोकसंख्या

15. 'What a brave boy you are' and 'Boys do not play with dolls.' These examples are related with which kind of gender studies ?

(A) Gender sensitization

(B) Gender socialization

(C) Gender equality

(D) Gender relations

15. 'तू किती शूर मुलगा आहेस' आणि 'मुले बाहुल्यांशा खेळत नसतात.' ही उदाहरणे लिंगभाव अध्ययनात कशाशी संबंधित आहेत ?

(A) लिंगभाव संवेदनशीलता

(B) लिंगभाव समाजीकरण

(C) लिंगभाव समानता

(D) लिंगभाव संबंध

16. Which of the following is *not* a cause of rural poverty in India ?
    (A) Low percentage of population engaged in non-agricultural pursuits
    (B) Absence of dynamic community leadership
    (C) Urge for education
    (D) Intercaste conflicts and rivalries

17. The Indian civilization encouraged which of the following factors comparing to the civilization in Europe ?
    (A) Spirit of Nationalism
    (B) Spirit of Capitalism
    (C) Diversity of Culture
    (D) Spirit of Parochialism

16. खालीलपैकी कोणते भारतातील ग्रामीण दारिद्र्याचे कारण होऊ शकत **नाही** ?
    (A) बिगर शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येचे कमी प्रमाण
    (B) गतिशील सामुदायिक नेतृत्वाची उणीव
    (C) शिक्षणासाठीची आच
    (D) आंतरजातीय संघर्ष आणि शत्रुत्व

17. युरोपमधील सभ्यतेच्या तुलनेत भारतातील सभ्यतेने खालीलपैकी कोणत्या घटकाला उत्तेजन दिले ?
    (A) राष्ट्रवादाचे चैतन्य
    (B) भांडवलवादाचे चैतन्य
    (C) संस्कृतीची विविधता
    (D) प्रादेशिकवादाचे चैतन्य

18. The Greeks were concerned about the size of the population more from the points of view of defence, security and government than from that of :

(A) Social resources

(B) Natural resources

(C) Political resources

(D) Economic resources

19. It must be pointed out that the doctrine of Confucius on marriage, family and procreation were generally :

(A) in favour of population increase

(B) in favour of population control

(C) not in favour of population control

(D) in favour of small family

18. संरक्षण, सुरक्षितता आणि शासनव्यवस्था या दृष्टिकोनातून ग्रीक हे लोकसंख्येच्या आकाराच्या बाबतीत खालील कोणत्या गोष्टीपेक्षा अधिक सजग होते ?

(A) सामाजिक साधनसंपत्ती

(B) नैसर्गिक साधनसंपत्ती

(C) राजकीय साधनसंपत्ती

(D) आर्थिक साधनसंपत्ती

19. विवाह, कुटुंब आणि प्रजोत्पादन या संबंधीची कन्फ्यूशियसचे तत्त्व कशासाठी होते हे स्पष्ट करणे का आवश्यक आहे ?

(A) लोकसंख्या वाढीच्या समर्थनार्थ

(B) लोकसंख्या नियंत्रणाच्या समर्थनार्थ

(C) लोकसंख्या नियंत्रणाच्या विरोधात

(D) लहान कुटुंबाच्या समर्थनार्थ

20. 'In the thousand slums of India's industrial centres manhood is unquestionably brutalized, women dishonoured and childhood is poisoned at its very source.' Who made this statement ?

(A) A.R. Desai

(B) Radhkamal Mukherji

(C) Pandit Nehru

(D) N.R. Seth

21. When was the 'Medical Termination of Pregnancy Act' passed in India ?

(A) Year 1976

(B) Year 1971

(C) Year 1972

(D) Year 1975

20. 'भारतातील औद्योगिक केंद्रातील हजारो झोपडपट्ट्यात मनुष्यत्वाचे निःसंशय पाशवीकरण झाले आहे, स्त्रियांचा अवमान केला जात आहे आणि बाल्यावस्था ही लहान वयातच दूषित केली जात आहे.' हे विधान कोणी केले आहे ?

(A) ए.आर. देसाई

(B) राधकमल मुखर्जी

(C) पंडित नेहरू

(D) एन.आर. सेठ

21. भारतात 'वैद्यकीय गर्भपात कायदा' केव्हा संमत करण्यात आला ?

(A) वर्ष 1976

(B) वर्ष 1971

(C) वर्ष 1972

(D) वर्ष 1975

22. Given below are two statements, one is labelled Assertion (A) and other is Reason (R) :

**Assertion (A) :** The classification of agrarian classes are not randomly given into number of social categories.

**Reason (R) :** The classification of agrarian classes into their social categories are determined by specific theoretical assumption.

Select the *correct* answer from the codes given below :

**Codes :**

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

22. खाली दोन विधाने दिली आहेत, एकास विधान (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

**विधान (A) :** कृषक वर्गाचे वर्गीकरण हे संख्यात्मक सामाजिक वर्गावारीच्या यादृच्छिक स्वरूपात दिलेले नाही.

**कारण (R) :** कृषक वर्गाचे त्यांच्या सामाजिक वर्गवारीनुसार असलेले वर्गीकरण हे विशिष्ट अशा सैद्धांतिक गृहीतकानुसार निर्धारित होत असते.

खाली दिलेल्या संकेतांकामधून **अचूक** उत्तर निवडा :

**संकेतांक :**

(A) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे परंतु (R) हे बरोबर आहे

23. Since when the population of India has become 'Explosive' ?
   (A) Since 1941
   (B) Since 1931
   (C) Since 1951
   (D) Since 1921

24. 'The right of women to decide freely and responsibly on the number and spacing of their children and to have access to the information and means to enable them to exercise that right.' Who declared this ?
   (A) The Government of India
   (B) The National Population Policy
   (C) The World Conference of the Women's Year 1975
   (D) The World Population Conference at Bukharest

23. भारताची लोकसंख्या केव्हापासून 'स्फोटक' बनली ?
   (A) 1941 पासून
   (B) 1931 पासून
   (C) 1951 पासून
   (D) 1921 पासून

24. 'आपल्याला संख्येने किती मुले असावीत आणि त्यांच्या मध्ये किती अंतर असावे याविषयी जबाबदारपणे आणि मुक्तपणे निर्णय घेण्याचा स्त्रियांना हक्क आहे, तसेच तो हक्क अंमलात आणण्यासाठीची माहिती व साधने' मिळविण्याचाही त्यांना अधिकार आहे.' असे कोणी जाहीर केले ?
   (A) भारत सरकार
   (B) राष्ट्रीय लोकसंख्या धोरण
   (C) 1975 ची जागतिक महिला परिषद
   (D) बुखारेस्टची जागतिक लोकसंख्या परिषद

25. If the population decreased, Plato's remedy was :

(A) Migration

(B) Emmigration

(C) Immigration

(D) Procreation

26. Who is the author of a book entitled 'People, Health and Diseases : The Indian Scenario' ?

(A) Veena Bhasin

(B) Ashish Bose

(C) Venkatratnam

(D) Giri Raj Gupta

25. जर लोकसंख्या कमी झाली तर त्यावर प्लेटो याने कोणती उपाययोजना सांगितली ?

(A) स्थलांतर

(B) उत्स्थलांतर

(C) आस्थलांतर

(D) उत्पादन

26. 'पीपल, हेल्थ अँड डिसीज : दि इंडियन सिनॅरिओ' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?

(A) वीणा भसीन

(B) आशिश बोस

(C) वेंकटरत्नम्

(D) गिरीराज गुप्ता

27. Which committee recommended the extension of the Health Insurance Scheme to other sections of society ?

(A) Kartar Singh Committee

(B) Bhore Committee

(C) Shrivastava Committee

(D) Mudaliar Committee

28. Who have edited the book on 'Studies in Social Dynamics of Health Care' ?

(A) Ashish Bose and P.B. Desai

(B) Giri Raj Gupta

(C) S.C. Basu

(D) Lal Shivshankar and Chandani Ambika

27. आरोग्य विमा योजनेचा विस्तार समाजाच्या इतर विभागामध्येही करावा अशी शिफारस कोणत्या समितीने केली ?

(A) कर्तारसिंग समिती

(B) भोरे समिती

(C) श्रीवास्तव समिती

(D) मुदलियार समिती

28. 'स्टडीज इन सोशल डायनॅमिक्स ऑफ हेल्थ केयर' हे पुस्तक कोणी संपादित केले ?

(A) आशिश बोस आणि पी.बी. देसाई

(B) गिरीराज गुप्ता

(C) एस.सी. बसु

(D) लाल शिवशंकर आणि चंदाणी अंबिका

29. In which city the 'Slums' are known as 'Bastis' ?

(A) Chennai

(B) Mumbai

(C) Kanpur

(D) Delhi

30. Every year on June 26, ever since 1991 has been in observance to mark the day of ............................ .

(A) International Population Day

(B) International Day Against Drug Abuse and Illicit Trafficking

(C) International Women's Day

(D) World Health Day

29. कोणत्या शहरातील 'झोपडवस्तीला' 'बस्ती' या नावाने ओळखले जाते ?

(A) चेन्नाई

(B) मुंबई

(C) कानपूर

(D) दिल्ली

30. 1991 पासून दरवर्षी 26 जून हा दिवस कोणत्या कारणासाठी साजरा केला जातो ?

(A) जागतिक लोकसंख्या दिन

(B) मादकपदार्थ दुरुपयोग आणि अतिरिक्त व्यापार प्रतिबंध आंतरराष्ट्रीय दिवस

(C) आंतरराष्ट्रीय महिला दिवस

(D) जागतिक आरोग्य दिन

31. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

**List I**

**(Books)**

(*a*) India's Villages

(*b*) Indian Village

(*c*) Indian Villages in Transition

(*d*) Caste and Class in India

**List II**

**(Authors)**

(1) S.C. Dube

(2) G.S. Ghurye

(3) M.N. Srinivas

(4) A.R. Desai

(5) Andre Beteille

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (5) | (3) | (4) |
| (B) | (4) | (3) | (5) | (2) |
| (C) | (2) | (3) | (4) | (1) |
| (D) | (3) | (1) | (4) | (2) |

31. खालील यादी I व यादी II मधील नोंदीच्या जोड्या लावा आणि दिलेल्या संकेतांकतून योग्य उत्तर निवडा :

**यादी I**

**(पुस्तके)**

(*a*) इंडियाज व्हिलेजेस

(*b*) इंडियन व्हिलेज

(*c*) इंडियन व्हिलेजेस इन ट्रान्झिशन

(*d*) कास्ट अँड क्लास इन इंडिया

**यादी II**

**(लेखक)**

(1) एस.सी. दुबे

(2) जी.एस. घुर्ये

(3) एम.एन. श्रीनिवास

(4) ए.आर. देसाई

(5) आंद्रे बेते

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (5) | (3) | (4) |
| (B) | (4) | (3) | (5) | (2) |
| (C) | (2) | (3) | (4) | (1) |
| (D) | (3) | (1) | (4) | (2) |

32. Which of the following is *not* a part of peasant struggle classified by Kathleen Gough ?

(A) Liberal Reformist Movement

(B) Restorative Rebellions

(C) Mass insurrections

(D) Social Manditory

33. How many villages are situated in India according to the 2011 census ?

(A) 6,20,880

(B) 6,40,887

(C) 5,76,000

(D) 5,71,000

32. खालीलपैकी कोणता घटक हा कॅथलीन गॉग यांनी वर्गीकरण केलेल्या शेतकरी संघर्षाचा घटकभाग होत **नाही** ?

(A) उदारमतवादी सुधारणात्मक चळवळ

(B) प्रबळ बंडरवाद

(C) लोक उठाव

(D) सामाजिक लुटेरे

33. 2011 च्या जनगणनेनुसार भारतात किती खेडी आहेत ?

(A) 6,20,880

(B) 6,40,887

(C) 5,76,000

(D) 5,71,000

34. By which name the bonded labourers are known as in Hyderabad ?

(A) Jeethams

(B) Halis

(C) Adiyas

(D) Bhagela

35. Who wrote the article on 'G.S. Ghurye on Culture and Nation Building' in Sociological Bulletin in 1993 ?

(A) A.R. Momin

(B) C.N. Venugopal

(C) Y.B. Damte

(D) A.R. Desai

34. वेठबिगार हे हैद्राबादमध्ये कोणत्या नावाने ओळखले जातात ?

(A) जीथमस्

(B) हालीज

(C) आदियाज

(D) भागेला

35. 1993 मध्ये सोशिऑलॉजिकल बुलेटिनमध्ये 'जी. एस. घुर्ये ऑन कल्चर अँड नेशन बिल्डींग' या विषयीचा लेख कोणी लिहिला ?

(A) ए.आर. मोमीन

(B) सी.एन. वेणूगोपाळ

(C) वाय.बी. दामते

(D) ए.आर. देसाई

36. The concept of 'Indexicality' is associated with :

(A) Phenomenology

(B) Ethnomethodology

(C) Psychoanalysis

(D) Neo-functionalism

37. The term 'Cynical performance' is used by :

(A) Foucault

(B) Derrida

(C) Goffman

(D) Garfinkel

36. 'निर्देशात्मकता' ही संकल्पना कशाशी संबंधित आहे ?

(A) प्रघटनाशास्त्र

(B) लोकान्वयपद्धतीशास्त्र

(C) मानस-विश्लेषण

(D) नव-प्रकार्यवाद

37. 'माणूसघाणी कृती' ही संज्ञा कोणी वापरली आहे ?

(A) फुको

(B) डेरिडा

(C) गॉफमन

(D) गारफिंकेल

38. 'Social reality consists of objective, socially created interpretations and patterns of interpretations.' Who formulated this view ?

(A) Gramsci

(B) Tonnis

(C) Berger and Luckmann

(D) Lash and Urry

38. 'उद्दिष्टे सामाजिकदृष्ट्या निर्मित अन्वयार्थ आणि अन्वयार्थाचे प्रतिमान यावर सामाजिक वास्तवता आधारित असते.' हा दृष्टिकोन कोणी मांडली ?

(A) ग्रामशी

(B) टोनीस

(C) बर्जर आणि लुकमन

(D) लॅश आणि उर्ये

39. Who is associated with the book 'Reading Capital' ?

(A) Jeffery Alexander

(B) Habermass

(C) Althusser

(D) Foucault

39. 'रिडींग कॅपिटल' हे पुस्तक कोणाशी संबंधित आहे ?

(A) जेफ्री अलेक्झांडर

(B) हेबरमास

(C) अल्थुजर

(D) फुको

40. Who wrote the following : 'Theoretical Logic in Sociology' ?

(A) J. Alexander

(B) T. Parsons

(C) M. Weber

(D) J. Derrida

41. Which of the following sets of concepts is used by Anthony Giddens ? (Choose the correct *one*)

(A) Structure system and looking glass self

(B) Risk society and ecological communication

(C) Life world and stock knowledge

(D) Structuration and self as a reflexive project

40. 'थिअॅरिटिकल लॉजिक इन सोशिऑलॉजी' याचे लेखन कोणी केले आहे ?

(A) जे. अलेक्झांडर

(B) टी. पार्सन्स

(C) एम. वेबर

(D) जे. डेरिडा

41. खालीलपैकी कोणता संकल्पनांचा संच अँथनी गिडन्स यांनी वापरला आहे ? (अचूक तो निवडा)

(A) संरचना व्यवस्था आणि स्वप्रतिबिंबात्मक स्व

(B) जोखीम समाज आणि परिस्थितीशास्त्राचा संप्रेषण

(C) जीवनविश्व आणि ज्ञान भांडार

(D) संरचनात्मकता आणि स्व—एक प्रतिक्षिप्त प्रकल्प

42. Phenomenological sociologists have a great concern for :

(A) Empiricism

(B) Positivism

(C) Consciousness

(D) Behaviourism

43. Who has recognized 'Agency' as a principal constituent of human existence and rejects the kinds of body obsession and body fetishism characteristic of contemporary life ?

(A) Anthony Giddens

(B) Foucault

(C) Derrida

(D) Ulrich Beck

42. प्रघटनाशास्त्रीय समाजशास्त्रज्ञाना कशा विषयी अधिक कळकळ आहे ?

(A) अनुभवाश्रिततावाद

(B) वस्तुनिष्ठतावाद

(C) जाणीवात्मकता

(D) वर्तनवाद

43. मानवी अस्तित्वाचा एक मुख्य घटक 'संघटना' आणि समकालीन जीवनाची वैशिष्ट्ये म्हणून मानवी जीवनाला घेरणाऱ्या प्रवृत्ती आणि अंधश्रद्धावाद याना कोणी मान्यता दिली ?

(A) अँथनी गिडन्स

(B) फुको

(C) डेरिडा

(D) उलरिच बेक

44. Who argued that human subject is constituted through power and knowledge ?

(A) Giddens

(B) Derrida

(C) Foucault

(D) J. Alexender

44. मानवासंबंधीचा विषय हा सामर्थ्य आणि ज्ञान यानुसार तयार झाली आहे असे कोणी प्रतिपादन केले आहे ?

(A) गिडन्स

(B) डेरिडा

(C) फुको

(D) जे. अलेक्झांडर

45. Who has indicated diversities of Indian Culture and contributed a book on "Diversities" ?

(A) R.K. Mukherjee

(B) D.P. Mukherjee

(C) G.S. Ghurye

(D) S.C. Dube

45. भारतीय संस्कृतीची विविधता कोणी निदर्शनास आणली आहे आणि 'डायव्हरसिटीज' या पुस्तकाचे योगदान दिले आहे ?

(A) आर.के मुखर्जी

(B) डी.पी. मुखर्जी

(C) जी.एस. घुर्ये

(D) एस.सी. दुबे

46. Who has written the book 'Tribal Heritage of India' (1977) ?

(A) S.C. Dube

(B) B.R. Ambedkar

(C) Surajit Sinha

(D) N.K. Bose

46. 'ट्रायबल हेरिटेज ऑफ इंडिया' (1977) हे पुस्तक कोणी लिहिले ?

(A) एस.सी. दुबे

(B) बी.आर. आंबेडकर

(C) सुरजित सिन्हा

(D) एन.के. बोस

47. Caste and gender are :

(A) Interlocking hierarchies

(B) Separate concepts with no relation to each other

(C) Caste is more opressive system than gender inequality

(D) Caste is socially and traditionally constructed inequality while gender is socio-cultural creation

48. The author of 'Social Background of Indian Nationalism' is :

(A) N.K. Bose

(B) S.C. Dube

(C) A.R. Desai

(D) David Hardiman

47. जात आणि लिंग भाव म्हणजे ?

(A) परस्परात गुंतलेली श्रेणीरचना

(B) परस्पराशी काहीही संबंध नसलेल्या संकल्पना

(C) लिंगभाव असमानतेपेक्षा जात ही अधिक जुलूमी व्यवस्था आहे

(D) जात ही सामाजिकदृष्ट्या आणि परंपरागत निर्माण केलेली असमानता आहे तर लिंगभाव ही सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या निर्मित संकल्पना आहे

48. 'सोशल बॅकग्राऊंड ऑफ इंडियन नॅशनॅलिझम' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?

(A) एन.के. बोस

(B) एस.सी. दुबे

(C) ए.आर. देसाई

(D) डेव्हिड हार्डीमन

49. Privatization of education in India is a consequence of which one of the following ?

(A) Urbanization

(B) Globalization

(C) Capitalism

(D) Science and Technology

50. Which of the following institution is working for correction of the juvenile delinquents in India ?

(A) Shelter Homes

(B) Ashram Schools

(C) Remand Homes

(D) Open Prison

51. The condition of being estranged or dissociated from the surrounding society is known as :

(A) Alienation

(B) Anomie

(C) Division of labour

(D) Rationality

49. भारतातील शिक्षणाचे खाजगीकरण हे खालीलपैकी कोणत्या घटकाचा परिणाम आहे ?

(A) नागरीकरण

(B) जागतिकीकरण

(C) भांडवलवाद

(D) विज्ञान आणि तंत्रज्ञान

50. खालीलपैकी कोणती संस्था भारतात बालगुन्हेगारांची सुधारणा यासाठी कार्यरत आहे ?

(A) सुरक्षागृह

(B) आश्रमशाळा

(C) रिमांड होम

(D) खुला तुरुंग

51. अवतीभोवतीच्या समाजापासून वेगळे होणे अथवा असाहचर्यात्मक परिस्थिती ही कोणत्या नावाने ओळखली जाते ?

(A) अलगता

(B) प्रमाणकशून्यता

(C) श्रमविभाजन

(D) बुद्धिनिष्ठता

52. Who opined that formal organization is a system of consciously co-ordinated activities of two or more persons ?

(A) Delbert C. Miller

(B) William H. Form

(C) Chester I. Barnard

(D) Kenneth Boulding

53. Who has propounded the concept of Bureaucracy ?

(A) Henri F. Fayol

(B) F.W. Taylor

(C) Max Weber

(D) Emile Durkheim

52. 'दोन किंवा अधिक व्यक्तिंच्या जाणीवात्मक समन्वयाच्या कृतींची व्यवस्था म्हणजे औपचारिक संघटन होय.' असे कोणी म्हटले आहे ?

(A) डेलबर्ट सी. मिलर

(B) विल्यम एच. फॉर्म

(C) चेस्टर आय. बर्नार्ड

(D) केनेथ बोल्डिंग

53. नोकरशाहीची संकल्पना कोणी प्रतिपादित केली आहे ?

(A) हेन्री एफ. फेयॉल

(B) एफ. डब्ल्यू. टेलर

(C) मॅक्स वेबर

(D) एमिल डुरखाईम

54. Which one is *not* an important characteristic of an organization ?

(A) Common goal

(B) Division of labour

(C) Integration

(D) Information

55. Which article says that 'The State shall make provision for securing just and humane conditions of work and for maternity relief' ?

(A) Article 43

(B) Article 41

(C) Article 45

(D) Article 42

54. संघटनाचे कोणते महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होत **नाही** ?

(A) सामुहिक उद्दिष्ट

(B) श्रमविभाजन

(C) एकात्मता

(D) माहिती

55. कामाची मानवीस्थिती आणि प्रसूती सवलत मिळण्यासाठी राज्य जी उपायोजना करते त्याचा कोणत्या कलमात उल्लेख केलेला आहे ?

(A) कलम 43

(B) कलम 41

(C) कलम 45

(D) कलम 42

56. The Indian Pilot's Guild is an example of :

(A) Industrial Unions

(B) General Unions

(C) Craft Unions

(D) Workers Federations

57. 'The Human Relations of an Industrial Civilization' is written by :

(A) F.W. Taylor

(B) Robert Owen

(C) Henry Fayol

(D) Elton Mayo

56. 'द इंडियन पायलट्स गिल्ड' हे कशाचे उदाहरण आहे ?

(A) औद्योगिक संघटना

(B) जनरल युनियन्स

(C) हस्तोद्योग संघटना

(D) कामगार संघ

57. 'दि ह्यूमन रिलेशन्स ऑफ अॅन इंडस्ट्रियल सिव्हिलायझेशन' हे पुस्तक कोणती लिहिले आहे ?

(A) एफ.डब्ल्यू. टेलर

(B) रॉबर्ट ओवेन

(C) हेन्री फेयॉल

(D) एल्टन मेयो

58. Ralf Dahrendorf's notion of conflict in case of 'Class and Class Conflict in Industrial Society' is based on :

(A) Power

(B) Status

(C) Authority

(D) Honour

59. Hawthorne studies were carried out in :

(A) Western Electric Company in USA

(B) Marion Virginia Plant in USA

(C) Tavistock Institute in London

(D) Michigan Survey Research Centre in New Jersey

58. औद्योगिक समाजातील 'वर्ग आणि वर्गसंघर्ष' याविषयीची राल्फ डऱ्हेंडॉर्फची संघर्षाची संकल्पना कशावर आधारित आहे ?

(A) सत्ता

(B) दर्जा

(C) अधिकार

(D) सन्मान

59. हॉथोर्नचे अध्ययन कुठे करण्यात आले ?

(A) वेस्टर्न इलेक्ट्रीक कंपनी इन अमेरिका

(B) मेरियन व्हर्जिनिया प्लँट इन अमेरिका

(C) टॅव्हिस्टॉक इन्स्टिट्युट इन लंडन

(D) मिशिगन सर्व्हे रिसर्च सेंटर इन न्यू जर्सी

60. In India, the Royal Commission on Labour took place in :

(A) 1931

(B) 1930

(C) 1932

(D) 1935

61. Human Development is defined by the UNDP as :

(A) increasing mobility

(B) decreasing mortality

(C) increasing consumerism

(D) enlarging people's life choices

62. Low growth of population is an indicator of :

(A) Economic growth

(B) Economic depression

(C) Economic underdevelopment

(D) Marginalisation

60. भारतात 'रॉयल कमिशन ऑन लेबर'ची स्थापना केव्हा झाली ?

(A) 1931

(B) 1930

(C) 1932

(D) 1935

61. यु.एन.डी.पी. ने मानवी विकासाची व्याख्या कशी केली आहे ?

(A) वाढती गतिशीलता

(B) घटती मर्त्यता

(C) वाढता ग्राहकवाद

(D) लोकांच्या जीवन निवडीचे विस्तारीकरण करणे

62. लोकसंख्येची होणारी कमी वाढ हे कशाचे निदर्शक आहे ?

(A) आर्थिक विकास

(B) आर्थिक नैराश्य

(C) आर्थिक अविकास

(D) सीमांतीकरण

63. How Samir Amin explains the uneven development ?
    - (A) through the export of capital in the periphery with the advantage of low wage-cost
    - (B) through the import of sustainable resources
    - (C) through intensification of agro-economy
    - (D) through collaborating with feudal power

64. The Gandhian Sarvodaya framework focuses upon :
    - (A) Economic affluence
    - (B) Prosperity of all
    - (C) Utilitarianism
    - (D) Pluralism

65. The most feminists agree that the issue of violence against women is related to :
    - (A) Exploitation
    - (B) Alcoholism and drugs
    - (C) Power and control
    - (D) Poverty and male dominance

63. असंतुलित विकासाचे स्पष्टीकरण समीर अमीन यांनी कसे केले आहे ?
    - (A) अल्प-उत्पन्न किंमतीच्या फायद्यावर आधारित भांडवलाची परिघातील निर्यात
    - (B) शाश्वत संसाधनांची आयात करणे
    - (C) कृषी-अर्थव्यवस्थेचे विस्तारीकरण
    - (D) जमीनदारी शक्तीच्या सहकार्यावार आधारित

64. गांधीवादी सर्वोदय विचारसरणी कशावर प्रकाश टाकते ?
    - (A) आर्थिक संपत्ती
    - (B) सर्वांची भरभराट
    - (C) उपयुक्ततावाद
    - (D) अनेकतावाद

65. बहुतांश स्त्रीवादी याच्याशी सहमत आहेत की, स्त्रियांविरोधी हिंसाचाराची प्रवृत्ती ही पुढील गोष्टीशी संबंधित आहे :
    - (A) उपभोग
    - (B) मद्याधीनता आणि मादक द्रव्य सेवन
    - (C) सामर्थ्य आणि नियंत्रण
    - (D) दारिद्र्य आणि पुरुषी वर्चस्व

66. The book 'Maidens, Meal and Money' which talks about politics of production and reproduction is authored by :

(A) Claude Meillassoux

(B) Simone de Beauvoir

(C) Sandra Harding

(D) Levi Strauss

67. Matriarchy as a system is :

(A) Similar to matriliny

(B) Different from matriliny

(C) is based on matrifocal household

(D) Stronger than patriarchy

66. उत्पादन आणि पुनरुत्पादनाचे राजकारण याविषयीचे 'मेडनस्, मील अँड मनी' हे पुस्तक कोणी लिहिले आहे ?

(A) क्लॉड मीलॅसॉक्स

(B) सिमॉन दी बीवॉर

(C) सेन्ड्रा हार्डिंग

(D) लेव्ही स्ट्रॉस

67. मातृसत्ताक व्यवस्था ही एक ................. .

(A) मातृवंशीय व्यवस्थेशी सारखी आहे

(B) मातृवंशीय व्यवस्थेहून भिन्न आहे

(C) मातृस्थानीय गृहव्यवस्थेवर आधारित आहे

(D) पितृसत्तेपेक्षा प्रबळ आहे

68. Women in Development Approach (WID) was criticised because :

(A) It emphasized that women's status will improve through 'productive employment' which downplayed women's role in household and reproduction

(B) It gave a universal understanding that all women are oppressed in similar ways

(C) It failed to appreciate diversity of women's life

(D) It did not consider men's contributions to household

68. स्त्रियांच्या विकासाच्या दृष्टिकोनावर टीका करण्यात आली कारण :

(A) त्यामध्ये 'उत्पादक रोजगारातून स्त्रियांचा दर्जा उन्नत करण्यावर भर देण्यात आली आणि स्त्रियांची घर आणि पुनरुत्पादनातील भूमिका दुय्यम ठरविण्यात आली'

(B) सर्वच स्त्रिया सारख्याच मार्गाने भरडल्या जातात अशी एक सार्वत्रिक समजूत करून घेण्यात आली

(C) स्त्री जीवनाच्या विविधतेचे कौतुक करण्यात तो कमी पडला

(D) पुरुषांचे घरामधील योगदान त्यामध्ये विचारणात घेण्यात आले नाही

69. National Commission for women is :

(A) an NGO

(B) Customary body

(C) A Statutory body

(D) Parliamentary body

69. राष्ट्रीय महिला आयोग म्हणजे .............. .

(A) एक एन.जी.ओ.

(B) प्रथागत संघटन

(C) घटनात्मक संघटन

(D) संसदीय संघटन

70. Who has introduced the concept of anomie in Sociology ?

(A) Robert Merton

(B) Kai Erikson

(C) Emile Durkheim

(D) Max Weber

70. समाजशास्त्रात प्रमाणकशुन्यतेची संकल्पना कोणी मांडली ?

(A) रॉबर्ट मर्टन

(B) काई एरिकसन

(C) एमिल डुरखाईम

(D) मॅक्स वेबर

71. Who has argued that deviance is necessary for society as it fulfils two major functions of society ?

(A) Pareto

(B) Weber

(C) Giddens

(D) Durkheim

71. विचलन हे समाजात आवश्यक आहे कारण समाजाच्या दोन प्रमुख कार्यांची ते पूर्तता करते, असा प्रतिवाद कोणी केला आहे ?

(A) परेटो

(B) वेबर

(C) गिडन्स

(D) डुरखाईम

72. Name the writers of the book : "The New Criminology for a Social Theory of Deviance".

(A) Makino, Tsuboi and Dennerstein

(B) Vold, Bernard and Snipes

(C) Macrae, Maguive and Milbourne

(D) Taylor, Walton and Young

73. Which of the following factors was not a basis and part of Louis Dumont's book on "Homo Hierarchicus : The Caste System and its Implications" ?

(A) Classical texts

(B) Indology

(C) Structuralist approach

(D) Homogeneity

72. 'द न्यू क्रिमिनॉलाजी फॉर ए सोशल थिअरी ऑफ डेव्हियन्स' या पुस्तकाच्या लेखकांचे नाव सांगा :

(A) मॅकिनो, त्सुबोई आणि डेनेरस्टीन

(B) व्होल्ड, बर्नार्ड आणि स्निप्स

(C) मॅक्रे, मॅगीव्ह आणि मिलबोर्न

(D) टेलर, वॉल्टन आणि यंग

73. खालीलपैकी कोणता घटक हा लुई ड्यूमाँट यांच्या 'होमो हायरारकिकस : द कास्ट सिस्टीम अँड इटस् इंप्लीकेशन्स' या पुस्तकाचा आधार आणि भाग होत नाही ?

(A) अभिजात ग्रंथ

(B) प्राच्यविधा

(C) संरचनात्मक दृष्टिकोन

(D) एकात्मता

74. Match the following questions with the sociologists and select the *correct* answer from the codes given below :

**List I**

**(Questions)**

(*a*) Who was particularly interested in typifications to understand phenomenology ?

(*b*) Who calls an instance of focused interaction an encounter ?

(*c*) Who has coined the term 'Ethnomethodology' ?

(*d*) Who presumes the duality of structure in theory of structuration ?

**List II**

**(Sociologists)**

(1) A. Giddens

(2) H. Garfinkel

(3) I. Goffman

(4) A. Schutz

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (3) | (4) | (1) |
| (B) | (4) | (3) | (2) | (1) |
| (C) | (1) | (2) | (3) | (4) |
| (D) | (4) | (2) | (1) | (3) |

74. खालील प्रश्नांच्या समाजशास्त्राज्ञांशी जोड्या जुळवा आणि खाली संकेतांकातून योग्य पर्याय निवडा :

**यादी I**

**(प्रश्न)**

(*a*) प्रघटनाशास्त्र समजून घेण्यात त्याच्या वर्गवारी करण्यात विशेषकरून कोणाला आस्था होती ?

(*b*) केंद्रीभूत आंतरक्रिया म्हणजे एक प्रकारच्या लढ्याची घटना आहे असे कोणी म्हटले आहे ?

(*c*) 'लोकान्वय पद्धतीशास्त्र' ही संकल्पना कोणी शोधली ?

(*d*) संरचना करणाच्या सिद्धांतात संरचनेची द्वंद्वात्मकता कोणी अनुमानित केली आहे ?

**यादी II**

**(समाजशास्त्रज्ञ)**

(1) ए. गिडन्स

(2) एच. गारफिंकेल

(3) आय. गॉफमन

(4) ए. शुत्झ

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (3) | (4) | (1) |
| (B) | (4) | (3) | (2) | (1) |
| (C) | (1) | (2) | (3) | (4) |
| (D) | (4) | (2) | (1) | (3) |

75. 'The rural social reality becomes very clear by the adoption of methodological particularism and not only depending on western approaches and methodology." Who has made this statement ?

(A) A.K. Saran

(B) Louis Dumont and David Pockock

(C) S.C. Dube

(D) G.S. Ghurye

75. ''विशिष्ट पद्धतीशास्त्राचा अवलंब केल्याने ग्रामीण समाजाची वास्तवता अधिक स्पष्ट होते, केवळ पाश्चात्य दृष्टीकोन आणि पद्धतीशास्त्रावर अवलंबून राहून ती स्पष्ट करता येत नाही.''

असे विधान कोणी केले आहे ?

(A) ए.के. सरन

(B) लुई ड्यूमाँ आणि डेव्हिड पोकॉक

(C) एस.सी. दुबे

(D) जी.एस. घुर्ये

**ROUGH WORK**